ग्रंथमालिका ‘बालसंस्कार’ : खंड ८

# राष्ट्र आणि धर्म प्रेमी व्हा !

मराठी (Marathi)


संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २५, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९९ लाख १० सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना (२२ मार्च १९९९)

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १२.३.२०२५ पर्यंत १३१ साधक संत झाले, तर १,०५२ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती (वर्ष १९९५ पासून आरंभ)

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक (२८ एप्रिल १९९८ ते १९ एप्रिल २००० पर्यंत)

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाधीने संबोधले जात आहे.

F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.


---

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

### ग्रंथ वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी पुढील प्रार्थना करा !

हे कुलदेवते (स्वतःच्या कुलदेवतेचे नाव घ्यावे), उपास्यदेवते (स्वतःच्या उपास्यदेवतेचे नाव घ्यावे) आणि गुरुदेवा (गुरु असल्यास), आपल्या कृपेने या ग्रंथातील विषय मला नीट समजू दे अन् त्यानुसार मला योग्य आचरणही करता येऊ दे.



# अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


卐 **मनोगत** ७

**१. मुलांनो, राष्ट्र अन् धर्म यांविषयीचे कर्तव्य समजून घ्या !** ११

**२. स्वभाषाभिमान हा राष्ट्राभिमान/धर्माभिमान यांचा पाया !** १७

२ अ. मातृभाषा २ आ. राष्ट्रभाषा 'हिंदी' १८

**३. स्वदेशीचा अवलंब करा आणि राष्ट्राभिमान जोपासा !** ३६

३ आ. विदेशी वस्तूंच्या वापरामुळे भारताची होत असलेली हानी ३७

३ इ. स्वदेशीचा पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रपुरुषांचा आदर्श ठेवा ! ३८

**४. राष्ट्राभिमान वाढवण्यासाठी या कृतीही करा !** ४९

४ अ. राष्ट्रपुरुषांची चरित्रे वाचा अन् त्यांचा आदर्श ठेवा ! ४९

४ आ. राष्ट्रध्वज आणि भगवा ध्वज यांचा मान राखा ! ५१

**५. धर्मप्रेम वाढवा आणि धर्माभिमानी बना !** ६८

५ उ. धर्माभिमान वाढवा ! ५ ऊ. धर्मरक्षण करा ! ७६

**६. राष्ट्रहित आणि धर्महित साधण्यासाठी हे प्रयत्नही करा !** ९१

**७. राष्ट्र-धर्म यांविषयीच्या चळवळींमध्ये सहभागी व्हा !** ९९

७ इ. ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचे पावित्र्य राखा ! १००

७ ई. भारताच्या मानचित्राचे (नकाशाचे) विकृतीकरण रोखा ! १००

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार !** १०४

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** १०५

## मनोगत

**कर्तव्यदक्ष भूमी, सीता रघुत्तमाची ।**
**रामायणे घडावी, येथे पराक्रमाची ।**
**शिर उंच उंच व्हावे, हिमवंत पर्वतांचे ।**
**आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ॥**

कवीवर्य ग.दि. माडगूळकरांची स्वातंत्र्याविषयीची ही भावना किती उदात्त आहे ! स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रपुरुष आणि क्रांतीकारक यांनी आपले प्राण देशासाठी वाहिले नसते, तर आज आपण 'स्वतंत्र' म्हणून मानाने जगू शकलो असतो का ?

'आजची मुले, हे देशाचे भवितव्य आहे', असे म्हणतात. आजच्या मुलांच्या तोंडी कोणती गाणी असतात, यावर देशाचे भवितव्य अवलंबून असते ! पूर्वी मुलांच्या तोंडी 'मनाचे श्लोक' असत, तर आता 'पॉप' गीते असतात ! आज व्यायामशाळा बंद होत असून सर्वत्र 'डान्स क्लास' चालू होत आहेत ! राष्ट्रपुरुष अन् क्रांतीकारक नव्हे, तर चित्रपट-कलाकार अन् खेळाडू हे मुलांना आदर्श वाटत आहेत ! राष्ट्र अन् धर्म यांच्याविषयी आम्हाला खरंच किती अभिमान आहे ? केवळ शाळेत राष्ट्रगीत म्हटल्याने आणि सणासुदीला देवाला पाया पडल्याने हा अभिमान निर्माण होत नाही. त्यासाठी मनात राष्ट्र अन् धर्म यांच्याविषयी प्रेम निर्माण व्हावे लागते.

मुलांनो, केवळ चांगले शिक्षण घेऊन चांगली नोकरी केली अन् प्रामाणिकपणे जीवन जगले, म्हणजे आपण 'आदर्श नागरिक' बनतो, असे नाही. आज इतक्या वर्षांनंतरही छत्रपती शिवाजी महाराजांसारखे राष्ट्रपुरुष आणि समर्थ रामदासस्वामींसारखे धर्मपुरुष सर्वांच्याच स्मरणात रहातात; कारण ते आदर्श होते. ते आदर्श होते; कारण ते

राष्ट्र अन् धर्म यांसाठी जीवन जगले होते. मुलांनो, तुम्हालाही इतरांनी ‘आदर्श’ म्हणावे, असे वाटते ना ? मग त्यासाठी राष्ट्र अन् धर्म प्रेमी बनले पाहिजे. ते कसे बनावे, याचे अगदी सहजसोपे मार्गदर्शन या ग्रंथात केले आहे.

आज आपल्या देशामध्ये आतंकवाद, भ्रष्टाचार, दारिद्र्य, बेकारी, महिलांवर अत्याचार आदी अनेक समस्या आहेत. नेतेमंडळी भारताला अमेरिका, चीन यांप्रमाणे महासत्ता बनवण्याची घोषणा करतात. आपणही ते स्वप्न पहातो. महासत्ता असूनही अमेरिका आणि चीन या देशांमध्येही चोऱ्या, भ्रष्टाचार, गुंडगिरी, घातपात इत्यादी आहेच. तेथे पैसा अन् बळ आहे; पण आनंद नाही ! आपल्याला राष्ट्र कसे हवे ? समर्थ रामदासस्वामींनी वर्णन केलेल्या, छ. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या ‘हिंदवी स्वराज्या’प्रमाणे –

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले ॥
अभक्तांचा क्षय हो झाला ॥ आनंदवनभुवनी ॥

वनी, भुवनी, जिकडेतिकडे आनंदीआनंद ! सर्वांना आनंद देणारे राज्य शिवाजी महाराज कसे स्थापू शकले ? बाहूबळ हे एक कारण आहे, तर धर्मबळ हे दुसरे कारण आहे. समर्थ रामदासस्वामींसारख्या संतांनी महाराजांना आशीर्वाद दिले; कारण ते धर्माने वागणारे होते. महाराज धर्माने वागत; म्हणून त्यांची प्रजाही धर्माने वागत असे. या सर्वांचा परिणाम म्हणून ‘हिंदवी स्वराज्य’ हे सर्व दृष्टीने आदर्श आणि आनंदी असे राज्य होते.

मुलांनो, तुम्ही राष्ट्रपुरुष, संत आणि राम–कृष्ण यांसारख्या देवता यांचा आदर्श समोर ठेवला, धर्माचरण केले, नैतिक मूल्यांची जपणूक करून शिक्षण घेतले आणि त्या शिक्षणाचा उपयोग राष्ट्र अन् धर्म

यांच्या सेवेसाठी केला, तर भारतात पुन्हा ‘हिंदवी स्वराज्य’ (आदर्श राज्य) निश्चितच स्थापन होईल. असे ‘सुराज्य स्थापन करणे’, हेच तुमचे खरे ‘करियर’ आहे, हे लक्षात ठेवा !

या ग्रंथाच्या वाचनाने सर्व जण धर्माचरणी आणि राष्ट्रभक्त बनून त्यांना राष्ट्र अन् धर्म यांप्रतीचे कर्तव्य बजावण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक** F (PR 45RD)


**मुलांच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी साहाय्यभूत सनातनचे ग्रंथ !**

## स्वभावदोष घालवा आणि आनंदी व्हा !


सारणीलेखन करणे

- स्वभावदोष घालवण्याची आवश्यकता
- स्वभावदोषांमुळे होणाऱ्या चुकांचे दुष्परिणाम
- स्वतःतील स्वभावदोष शोधण्याची पद्धत
- आळस, राग आदी दोष घालवण्याचे उपाय
- मनाला ‘स्वयंसूचना’ देण्याच्या विविध पद्धती आणि उदाहरणे

## गुण जोपासा आणि आदर्श व्हा !




- गुण–संवर्धन प्रक्रिया म्हणजे काय ?
- मुलांनी गुणी बनणे का आवश्यक आहे ?
- गुण–संवर्धन सारणी का अन् कशी लिहावी ?
- स्वावलंबन, नम्रता इ. गुण कसे बाणवावेत ?
- गुण–संवर्धन केलेल्या सनातनच्या बालसाधकांची उदाहरणे